RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक १४(२)] मंगळवार, जानेवारी ३१, २०२३/माघ ११, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०२३.

**अधिसूचना**

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक न्यास्थाप-१०१९/८२३/प्र.क्र.१७३/कार्यासन ११.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या सोलापूर जिल्ह्यातील करमाळा महसुली तालुक्याशी संबंधित आहेत तेथवर त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक ५ फेब्रुवारी २०२३ पासून, सोलापूर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) करमाळा यांच्या विद्यमान न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांदरम्यान उद्‌भवणाऱ्या, त्यांच्या सर्वसाधारण व विशेष अधिकारितेमधील उक्त अधिनियमांन्वये निर्णय करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत, अधिकारिता असणारे न्यायालय म्हणून सोलापूर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), करमाळा यांचे न्यायालय विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे सहसचिव.